## बृहन्मुंबई महानगरपालिका

## लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व महाविद्यालय,शीव,मुंबई-22

**क्र.लोटिरु/33522/वआ दि.30.01.2026**

### जाहिरात

मा.महानगरपालिका आयुक्त यांच्या मंजूरी क्र. एमजीसी/एफ/8767 दि. 02.12.2025 व दि. 26.12.2025 नुसार, लो.टि.म.स. रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयाच्या आस्थापनेवरील खालील तक्त्यात नमूद कलेली विविध संवर्गातील पदे निव्वळ कंत्राटी पध्दतीने स्थानिक पातळीवर जाहिरात देऊन भरण्यात येत आहेत. प्रस्तुत जाहिरातीत नमुद केल्याप्रमाणे आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हता/ पात्रता धारण करीता असलेल्या उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावरुन सहाय्यक वैद्यकीय अधिकारी पदाकरीता असलेल्या अर्जाच्या नमुन्याची प्रत (Print) घेऊन लोटिमस रुग्णालय, कॉलेज इमारत, तळ मजला, रोखपाल विभागात (रुम नं 15) येथे रु. 790/- + 18% जीएसटी रु 143/- =एकूण 933/- इतके रोख शुल्क दि. 05.02.2026 ते दि .18.02.2026 पर्यंत कार्यालयीन वेळेत ( सर्व शनिवार तसेच रविवार व सार्वजनिक सुट्टी वगळून) सकाळी 11:00 ते दुपारी 2:30 वाजेपर्यंत भरुन, त्याची मूळ पावती अर्जासोबत जोडून पूर्ण भरलेल्या अर्जासोबत शैक्षणिक अर्हतेची सर्व कागदपत्रे जोडून लो.टि.म.स.रुग्णालयाच्या आवक/ जावक विभागात दि. 05.02.2026 ते 18.02.2026 पर्यंत संध्याकाळी 5:00 वाजेपर्यंत सादर करावा.

उमेदवार संबंधित पदासाठीची विहित अर्हता/अटींची पूर्तता करीत असून ते कंत्राटी पदासाठी पात्र असल्याची खातरजमा उमेदवारांनी अर्ज सादर करण्यापूर्वी स्वतः करावयाची आहे. उमेदवाराच्या अर्जात नित्य वापरात असलेला वैध (Valid) ई-मेल आयडी असणे आवश्यक आहे. तसेच अर्जदाराने जाहिरातीत नमूद अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज अवैध ठरविण्यात येईल.

कंत्राटी पध्दतीने भरावयाच्या पदांचा तपशील खालीलप्रमाणे -

| अ. क्र. | पदाचे नाव | एकूण पदे | ठोक मानधन (प्रति माह) | शैक्षणिक अर्हता |
|---|---|---|---|---|
| 1. | सहाय्यक वैद्यकिय अधिकारी | 11 | रु.90000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एम.बी.बी.एस. पदवी प्राप्त केलेला असावा.<br>2. उमेदवार महाराष्ट्र मेडिकल काउंसिल मध्ये रजिस्टर्ड असावा.<br>3. उमेदवाराने मान्यताप्राप्त रुग्णालयातून 6 महिन्याचे दोन सत्र आवासी अधिकारी पद (HOUSE POST) किंवा एका वर्षाचे सलग निवासी वैद्यकिय अधिका-याचे पद (One Year Residency Post) इतका अनुभव धारण केलेला असणे आवश्यक आहे.<br>4. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 100% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>5. डीओईएसीसी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब'स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने/तिने |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | महाराष्ट्र राज्य आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |
| 2. | सहाय्यक वैद्यकिय अधिकारी (HBOT विभाग) | 3 | • एम.बी.बी.एस करीता रु.75000/-<br>• बी.ए.एम.एस . करीता रु. 50,000/- | 1. उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाची एमबीबीएस पदवी किंवा बीएएमएस पदवी प्राप्त केलेली असावी.<br>2. उमेदवार संबंधित महाराष्ट्रातील मेडिकल काउंसिल मध्ये रजिस्टर्ड असावा.<br>3. संबंधित कामाचा 1 ते 2 वर्षाचा अनुभव असल्यास प्राधान्य<br>4. उमेदवार माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र किंवा तत्सम किंवा उच्चतम परीक्षेत किमान 100% गुणांचा मराठी विषय घेऊन उत्तीर्ण असावा.<br>5. डीओईएससी सोसायटीद्वारे घेण्यात येणारी संगणकामधीन सीसीसी परीक्षा 'ओ' स्तर वा 'ए' स्तर वा 'ब'स्तर वा 'क' स्तरात उत्तीर्ण केलेली असावी अथवा त्याने/तिने महाराष्ट्र राज्य आणि तंत्र शिक्षण, मुंबईद्वारा संचालित एमएससीआयटी /जी.ई.सी.टी. चे प्रमाणपत्र असणे आवश्यक आहे. |

**वयोमर्यादा :** उमेदवाराचे वय दिनांक 01.04.2026 रोजी **38** वर्षापेक्षा जास्त असता कामा नये.

**निवडीचे निकष व कार्यपध्दती :**

**1.**सदर पदाची विहित केलेली शैक्षणिक अर्हता व मुलाखतीच्या प्राप्त झालेल्या गुणांच्या आधारे उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करुन, निवड यादी तयार करण्यात येईल.सदर निवड यादी लो.टि.म.स रुग्णालयाच्या सुचना फलकावर लावण्यात येईल.

**2. मुलाखतीचे ठिकाण दिनांक व वेळ :** अर्जदाराने अर्जात नमूद केलेल्या Email ID वर दोन दिवस आधी कळविण्यात येईल. त्यामुळे Email ID अर्जात स्पष्ट नमूद करावा.

**3. अर्ज शुल्कासह करण्याचा कालावधी:** दि.05.02.2026 ते 18.02.2026

**4. अर्जाचे शुल्क:** रुपये 790/- + 18% जीएसटी रु.143/- = एकूण रु.933/ सदर शुल्क हे ना परतावा राहील व ते कोणत्याही परिस्थितीत परत केले जाणार नाही.

**5. सर्वसाधारण अटी:**

- कंत्राटी तत्वावर करण्यात आलेली नेमणूक ही निव्वळ तातपुरत्या स्वरुपाची आहे.
- सदर कंत्राट कालावधी हा नेमणूक कालावधीपासून **ते 31.03.2027** पर्यंत असेल.
- कंत्राटी तत्वावर करण्यात आलेली नेमणूक आवश्यक नसल्यास/ नियमित तत्वावरील सहाय्यक वैद्यकीय अधिकारी यांची नेमणूक झाल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता रद्द करण्यात येईल.
- कंत्राटी कालावधीत काम समाधानकारक न आढळल्यास अथवा शिस्तभंग केल्याचे निदर्शनास आल्यास कोणतीही

पूर्व सुचना न देता समाप्त करण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता(लो.टि.म.स ) यांच्याकडे राहील.

- सदर नेमणूक नियमित स्वरुपाची नसल्यामुळे काही अपरिहार्य परिस्थिती उद्भवल्यास निवड यादी रद्द करण्यात येईल.
- नेमणूक केलेल्या उमेदवारास कंत्राटी तत्वावरील नेमणूक नियमित स्वरुपात करण्यासाठी कोणताही दबाव किंवा न्यायालयात दाखल करता येणार नाही तसेच त्यांना नियमित सेवेचे कोणतेही फायदे अनुज्ञेय असणार नाहीत.
- अर्जदाराने अर्ज स्वहस्ताक्षरात भरावा, अपूर्ण अर्ज विचारात घेतला जाणार नाही.
- पासपोर्ट आकाराचा फोटो अर्जावर लावण्यात यावा.
- पत्रव्यवहारकरिता उमेदवाराने आपला घरचा पत्ता पिन कोडसहीत अर्जात पूर्ण भरावा. तसेच संपर्क साधण्यासाठी वैध भ्रमणध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी नमूद करावेत.
- पात्र उमेदवारांना कंत्राटी नियुक्ती देण्यापूर्वी संबंधीत पोलीस ठाण्याकडून उमेदवाराचे चारित्र्य व पुर्वचारित्र प्रमाणपत्र प्राप्त करणे आवश्यक असेल.
- उमेदवाराला कोणत्याही न्यायालयाने नैतिक अध:पतन किंवा फौजदारी स्वरुपाच्या खटल्यात शिक्षा दिली असल्यास, तसेच उमेदवाराविरुध्द पोलिस चौकशी/न्यायालयिन प्रकरण प्रलंबित असल्यास/ शिक्षा झालेली असल्यास उमेदावाराने त्याबाबत माहिती देणे आवश्यक आहे.
- अर्जदाराने जाहिरातीत नमूद अर्हतेबाबतची प्रमाणपत्रे अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. अन्यथा अर्ज अवैध ठरविण्यात येईल.
- निवडप्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्यास किंवा कोणतीही माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्यांची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झालेली असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता त्याची नियुक्ती समाप्त करण्यात येईल.
- कंत्राटी कर्मचाऱ्यांना देण्यात येणारे ठोक मानधना व्यतिरिक्त कोणत्याही प्रकारचा महागाई भत्ता, घरभाडे भत्ता इत्यादी अनुज्ञेय असणार नाही.
- उमेदवाराचे विवाह झाले असल्यास विवाहनोंदणी प्रमाणपत्र, नावात बदल झाल्याचे राजपत्र सादर करावे. तसेच ते नसल्यास विवाहित महिला उमेदवार विवाहापूर्वीच्या नावाने अर्ज करु शकतात.
- त्यांच्या कंत्राटी सेवेच्या कालावधीमध्ये दर 45 दिवसापूर्वी एक दिवसाचा सेवा खंड देण्यात येईल.
- नेमणूक केलेल्या उमेदवारास मा.संचालक (वै.शि.व.प्र.रु.) यांच्या परिपत्रक क्र.संचालक/ वै.शि.प्र.रु./3644 दि.14.10.2022 अन्वये नैमित्तिक रजा अनुज्ञेय राहतील व इतर कोणत्याही रजा अनुज्ञेय राहणार नाही.
- नियुक्तीचे वेळी उमेदवाराकडून रु.500/- बॉड पेपर वर करारनामा करुन घेण्यात येईल.
- कोणत्याही कारणास्तव निवड झालेल्या उमेदवारास पदाचा राजीनामा द्यावयाचा असल्यास त्याने 15 दिवसांची पूर्वसूचना देणे बंधनकारक आहे.
- लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व महाविद्यालय,शीव,मुंबई-22 येथे रुग्णालयात कोणत्याही विभागात तीन पाळीत काम करावे लागेल.
- उमेदवारास मुलाखतीसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.
- प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव निवडप्रक्रिया कोणत्याही वेळेस कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार मा.अधिष्ठाता(लो.टि.म.स) यांना आहेत.
- बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या रुग्णालयामध्ये कंत्राटी तत्वावर काम करणा-या अनुभवी उमेदवारास प्रथम प्राधान्य देण्यात येईल.
- उमेदवार बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या इतर खात्यामध्ये कंत्राटी तत्वावर कार्यरत असल्यास त्यांनी संबंधित

विभाग/खातेप्रमुख यांचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे.

**7. विशेष सुचनाः**

- यापूर्वी संबंधित कार्यालयात व अन्य ठिकाणी सादर केलेले/प्राप्त झालेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच बृहन्मुंबई महानगरपालिकेने कोणत्याही व्यक्तीला व इतर दुस-या संस्थेला अर्ज विकणे, स्विकारणे इत्यादींचा अधिकार दिलेला नाही याची कृपया नोंद घ्यावी.
- अर्जाचे विहित मुल्य भरुन त्याची पावती जोडल्याशिवाय अर्ज ग्राहय धरण्यात येणार नाहीत.
- टपालाने आलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाही.
- निवड झालेल्या उमेदवारास पोलिस ठाण्याचे चारित्र्य पडताळणी बाबतचे प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहिल.
- प्रतिक्षा यादी तयार करण्यात येईल व ती सहा महिन्यांकरीता वैध राहील.

**सोबतः अर्जाचा नमुना**

**सही /-**

**अधिष्ठाता**

**लो.टि.म.स.रुग्णालय, शीव, मुंबई-22**

## **बृहन्मुंबई महानगरपालिका**

**लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व महाविद्यालय, शीव, मुंबई-22**

पावती क्र……………………. दि………………..

अर्जाचा नमुना

पदाचे नाव -

प्रति,

अधिष्ठाता,

लो.टि.म.स.रुग्णालय, शीव,

मुंबई – 400022

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या लो.टि.म.स.रुग्णालय, शीव , मुंबई – 400022 येथे कंत्राटी तत्वावरील ___________________ या पदाकरिता दिनांक ___________________ च्या जाहिरातीनुसार मी खाली सही करणार विनंती अर्ज करत आहे.

माझी सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम ) : ______________________________________________________

2) भ्रमणध्वनी क्रमांक : ______________________________________________________

3) ई-मेल आयडी : ______________________________________________________

4) कायमचा पत्ता : ______________________________________________________

______________________________________________________

5) पत्रव्यवहाराचा पत्ता : ______________________________________________________

______________________________________________________

6) पदाचे नाव : ______________________________________________________

7) शैक्षणिक अर्हता : ______________________________________________________

8) जन्मदिनांक : ______________________________________________________

9) वय - दिनांक ______________ रोजी असलेले वय __________ महिने ___________ दिवस_________

मी या अन्वये प्रतिज्ञापूर्वक असे जाहिर करतो / करते की, वरील माहिती जाणीवपूर्वक तसेच विश्वासपूर्वक दिली असून, ती खरी आहे. जाहिरातीत दिलेल्या सर्व निकषांवर व शैक्षणिक अर्हतुनसार मी पात्र आहे. त्यापैकी कोणतीही माहिती खोटी आढळल्यामुळे माझा अर्ज फेटाळून लावल्यास किंवा निवडीच्या कुठल्याही टप्प्यावर माझी उमेदवारी रद्द केल्यास माझी काही तक्रार राहणार नाही.

सोबत : प्रमाणपत्राच्या प्रमाणित प्रती

दिनांक :

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराचे सही

(अर्जदाराचे नाव)

**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>लोकमान्य टिळक महानगरपालिका सर्वसाधारण रुग्णालय व महाविद्यालय,शीव,मुंबई-22</u>**

**वैयक्तिक माहिती ([illegible])**

1) संपूर्ण नाव (आडनाव प्रथम ) मराठीत

:___________________________________________________________

2) वडिलांचे संपूर्ण नाव

:___________________________________________________________

3) विवाहापूर्वीचे संपूर्ण नाव (महिलांकरिता)

:___________________________________________________________

4) पत्ता

:___________________________________________________________

5) दूरध्वनी / भ्रमणध्वनी क्रमांक

:___________________________________________________________

6) ई-मेल आयडी

:___________________________________________________________

7) लिंग - पुरुष / स्त्री

8) जन्मदिनांक : दिनांक_____________ महिना _____________ वर्ष________________

9) शैक्षणिक अर्हता :

| शैक्षणिक अर्हता | शालांत परीक्षा मंडळ / विद्यापीठाचे नाव | गुणांचा तपशील | | | उच्च माध्यमिक शालांत परीक्षेतील गुण | | उमेदवार किती प्रयत्नात परीक्षा उत्तीर्ण झाला. |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | प्राप्त गुण | पैकी | टक्केवारी | मराठी | इंग्रजी | |
| दहावी | | | | | | | |
| बारावी | | | | | | | |
| पदवी | | | | | | | |
| पदविका | | | | | | | |
| पदव्युत्तर | | | | | | | |
| फेलोशिप | | | | | | | |

10) अनुभव : ____________________________________________________

11) स्थानिक पोलिस ठाण्याचा पूर्ण पत्ता :

___________________________________________________________

12) उंची : ______ फूट : _____इंच, वजन : _____कि.ग्रॅ., शरीराची ठेवण : किरकोळ / मध्यम / सुदृढ

वर्ण _____, नेत्र वर्ण : ________________ वैयक्तिक खूण : ________________

13) संगणक विषयक ज्ञान : MS-CIT किंवा शासनाने विहित केलेल्या

संगणक विषयक अभ्यासक्रमाचे प्रमाणपत्र : आहे / नाही

14) उमेदवार सध्या नोकरी करीत आहे किंवा नाही ? होय / नाही

असल्यास त्याबाबतचा तपशिल :____________________________________________________________

कार्यरत संस्था/ विभाग / यांचे ना-हरकत प्रमाणपत्र ______________________________________________

15) उमेदवाराविरुध्द पोलीस चौकशी / न्यायालयीन प्रकरण प्रलंबित / प्रस्तावित आहे का ? असल्यास त्याबाबतचा

तपशिल द्यावा. होय / नाही

16) उमेदवारास पूर्वी शिक्षा झाली होती का ? शिक्षा झाली असल्यास, होय / नाही

शिक्षेचा तपशील नमूद करण्या यावा व न्यायालयीन निर्णयाची प्रमाणित

प्रत अर्जासोबत जोडण्यात यावी.

आपला / आपली विश्वासू,

अर्जदाराची सही

(अर्जदाराचे नाव)

दिनांक :

ठिकाण :